# // प्रेसनोट //

## गोवर आणि रुबेला विशेष लसीकरण मोहीम

गोवर आणि रुबेला आजारांपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण करण्यासाठी राज्य शासनाने विशेष लसीकरण मोहीम हाती घेतली आहे. दि.१५ सप्टेंबर ते दि.३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत मिरा भाईंदर शहरातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना गोवर व रुबेलाची लस दिली जाईल. गोवर (मिझल्स्) हा आजार पॅरामिक्सोव्हायरस विषाणूमुळे होतो., तर रुबेला (जर्मन गोवर) हा रुबी व्हायरस नावाच्या विषाणूमूळे मुलांना होतो. हे दोन्ही अत्यंत संसर्गजन्य विषाणूजन्य आजार आहेत. जे हवेतील थेंबाव्दारे एका व्यक्तीकडून दुस-या व्यक्तीमध्ये पसरतात; विशेषत: खोकताना किंवा शिंकताना, दोन्ही आजारांमध्ये ताप आणि अंगावर पुरळ येणे ही सामान्य लक्षणे आहेत. सदर लसीकरण मोहीम राबविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य केंद्रांमार्फत विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर पथकांमध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, प्रसविका, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी आदींचा समावेश राहणार आहे.

या आजाराच्या गुंतागुंतीत अंधत्व, मेंदूज्वर, अतिसार, कानाचे आणि श्वसन संस्थेमध्ये संक्रमण (न्युमोनिया) दिसून येतात. रुबेलामुळे गर्भवती स्त्रिया व नवजात बालकांमध्ये गंभीर परिणाम होऊ शकतात. या आजारावर विशिष्ट उपचार उपलब्ध नसले तरी M.R. (एम.आर.) लसीकरण हे सर्वात प्रभावी संरक्षण आहे. गोवर रुबेला लसीकरणाचे प्रमाण ९५% जास्त साध्य करणे, M.R. (एम.आर.) लसीच्या दोन डोस मधील ड्रॉप आऊटरेट शून्यापर्यंत आणणे. ही या मोहिमेची उद्दिष्ट आहेत.

या मोहिमेचे यशस्वी होणे म्हणजे शहरातील प्रत्येक बालकाचे सुरक्षित भविष्य घडविणे होय. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, याकरीता पालक, शिक्षक व ग्रामस्थांनी सहकार्य करून ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासन मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(डॉ. प्रमोद पडवळ)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner